जैन समाजात प्रचंड खपाचे व लोकप्रिय मासिक

# जैन जागृति

(Since 1969) www.jainjagruti.in



❖ संस्थापक ❖

**स्व. श्री. कांतीलालजी चोरडिया**

६२ ऋतुराज सोसायटी, पुणे-सातारा रोड, भापकर पेट्रोल पंपा समोर, सिटी प्राईडच्या पुढची लेन, पुणे ४११०३७.

☎ : (०२०) २४२१५५८३

मोबाईल : संजय ९८२२०८६९९७, सुनंदा ९४२३५६२९९१

संपादक व प्रकाशक : संजय के. चोरडिया

संपादिका : सौ. सुनंदा एस. चोरडिया

❖ वर्ष ४९ वे ❖ अंक १२ वा ❖ ऑगस्ट २०१८ ❖ वीर संवत २५४४ ❖ विक्रम संवत २०७४


या अंकात


| | पान नं. |
|---|---|
| • ।। जिनेश्वरी ।। अध्याय २८ : मोक्षमार्ग गति | १५ |
| • पुणे चातुर्मास | १९ |
| • कव्हर तपशील | २४ |
| • दया सुखां दी बेलडी | ३१ |
| • बिना तप के तेरा निश्चित पतन है | ३७ |
| • जिंदगी की पाठशाला | ३९ |
| • क्या है धार्मिकता | ४० |
| • अ-देश कालचर्या त्याग | ४२ |
| • एकांगी ना बण | ४३ |
| • चातुर्मास तोडने का नहीं जोडने का सन्देश देता है। | ५१ |
| • जैनत्व और भविष्य | ५४ |
| • संयोग का चक्र | ५७ |
| • फ्रेंडशिप डे - मैत्रीचा परीस स्पर्श | ५९ |
| • जागृत विचार | ६० |
| • हास्य जागृति | ६१ |
| • हमें तुमसे प्यार कितना.... ? | ७१ |
| • क्या व्यर्थ हैं | ७९ |
| • एक विचित्र विडम्बना | |
| • मंथन - बदलते समय में 'माँ' शब्द की परिभाषा कहीं बदल न जाये ? | ८० |
| • चैतन्याचा स्वरु : आनंद गुरु | ८१ |
| • जैन परंपरा और मातंग वंश | ८७ |
| • जिज्ञासा को शांत करने का सुअवसर है - चातुर्मास | ८९ |
| • स्वत: सारखे जगू या | ९० |
| • नवकार आर्ट ग्रुप, पुणे - चित्रकला प्रदर्शन | ९२ |
| • चि. आनंद ललवाणी, पुणे - सुयश | ९३ |
| • वाचकांचे मनोगत | ९५ |
| • सुंधामाता मंदिर प्रतिष्ठा, पुणे | ९६ |
| • भारतीय जैन संघटना - परिचय संमेलन | ९७ |
| • जैन महाराष्ट्र बायोडाटा, पुणे | ९८ |

● ऋषि आनंद वन, पुणे – भूमीपूजन ९९
● श्री महावीर जैन विद्यालय, पुणे १००
● आज से उधार बंद १००
● जैन एकता का अनुपम उदाहरण, चेन्नई १०१
● डॉ. हिना हिंगड दीक्षा, सुरत १०१
● संचेती ट्रस्ट, पुणे १०७
● श्री आनंद पार्श्व, गुरुकुल – अहमदनगर १०७
● भारत जगातील ६ वी मोठी अर्थव्यवस्था १०९
● पुणे मनपा शिष्यवृत्ती मिळवा १११
● सुर्यदत्त ग्रुप, पुणे ११२
● के. कोठारी टोयोटा, पुणे – उद्घाटन ११३
● मोक्ष यहीं पर.... अभी ११५
● डायमंड डायरी ११७
● स्वाध्याय शिबिर, कात्रज ११८
● धन की दौड का कहीं छोर नहीं है १२१
● विविध धार्मिक, सामाजिक व राजकिय बातम्या


जैन जागृति मासिकाचे वर्गणी दर ❖ एका वर्षात तीन मोठ्या अंकासहित

| पंचवार्षिक | रु. २२०० | त्रिवार्षिक | रु. १३५० | वार्षिक | रु. ५०० |
|---|---|---|---|---|---|

या अंकाची किंमत ५० रुपये.

● www.jainjagruti.in
● www.facebook.com/jainjagrutimagazine


# जैन जागृति मासिकाचे ग्राहक बना !

- वीतराग वाणी, आचार्य, साधू, साध्वी यांचे लेख, धार्मिक, सामाजिक व शैक्षणिक लेख, धार्मिक कथा, बोधकथा, ऐतिहासिक पुरुषांचे जीवन चरित्र, तीर्थक्षेत्र परिचय, समाज प्रबोधन लेखमाला, दीपावली पूजन विधी व मुहूर्त, आरोग्य व गृहोपयोगी लेख, विविध बातम्या इ. साहित्य जैन जागृतित प्रकाशित केले जाते.
- आपण स्वत: जैन जागृतिचे ग्राहक बना व आपले नातेवाईक, मित्र, व्यापारी बंधू इत्यादींना वर्गणीदार नसतील तर त्यांना वर्गणीदार होण्यास सांगा. ● 'जैन जागृति' मासिकाची वर्गणी भरून इतरांना भेट पाठवा.

**सुसंस्कार व सदाचाराचा पुरस्कार करणाऱ्या 'जैन जागृति' मासिकाचे वर्गणीदार व्हा !**

## जैन जागृति – वर्गणीचे दर

| पंचवार्षिक | रु. २२०० | त्रिवार्षिक | रु. १३५० | वार्षिक | रु. ५०० |
|---|---|---|---|---|---|

वर्गणी व जाहिरात – रोख/मनिऑर्डर/ड्राफ्ट/AT PAR चेक/ पुणे चेकने / RTGS / SBI Online / Jain Jagruti Website इत्यादी द्वारा पाठवावी.

**JAIN JAGRUTI - BANK ACCOUNT DETAILS**

Bank : STATE BANK OF INDIA
Branch : Market Yard, Pune 37.
Current A/c No. : 10521020146
IFS Code : SBIN0006117

## जैन जागृति मासिकात जाहिरात व वर्गणीसाठी संपर्क करा

फोन (०२०) २४२१५५८३ **मो. संजय:९८२२०८६९९७ सुनंदा:९४२३५६२९९१, www.jainjagruti.in**
**Email : jainjagruti1969@gmail.com ● Press Email : prakash.offset@rediffmail.com**

### ◆ जैन जागृतिचे प्रतिनिधी ◆

❖ **भोसरी, चिंचवड, निगडी –** श्री. चांदमलजी लुंकड – फोन : २७११९९४९, मो. ९९२१९१९४०९
❖ **पुणे शहर ❖ कुर्डुवाडी –** श्री. सुभाष मोहनलाल लुणिया, मो. ८७९३०००००८१
❖ **गुरूवार पेठ, पुणे –** श्री. जैन पुस्तक भंडार, फोन : २४४७२९५८
❖ **धनकवडी, पुणे –** श्री. सुरेंद्र हिरालालजी बोरा, मो. ७५८८९४३०१५
❖ **सुखसागर नगर, कात्रज –** श्री. प्रफुल्लजी विजयकुमार मुनोत, मो. ९७३००४५७१८
❖ **महावीर प्रतिष्ठान, पुणे –** निलम रमेशचंद्र शहा, मो. ९०९६८००५४७
❖ **सदाशिव पेठ परिसर, पुणे –** सौ. स्वाती राजेंद्रजी कटारिया, मो. : ९८८१२०४३९०
❖ **वडगाव शेरी, पुणे –** सौ. भारती सुभाष नहार, मो. : ९८९०२७८३४६
❖ **वडगाव मावळ, पुणे –** श्री. राजेंद्र बाफना, मो. ९८२२२६२९०१
❖ **खडकी, पुणे –** श्री. विलास मुथा, मो. ९६२३१४८९८४
❖ **औंध, पाषाण, हिंजवडी, सांगवी, थेरगाव –** श्री. शिरिषकुमार शांतीलालजी डुंगरवाल, मो. ९०२१३००५५९
❖ **दापोडी, पुणे –** श्री. प्रवीण झुंबरलालजी चोरडिया, मो. ९९२२७५७७०६
❖ **नांदेड सिटी, पुणे –** श्री. प्रकाशजी हरकचंदजी बोथरा, मो. ९०११९८३६६६
❖ **दौंड, श्रीगोंदा –** श्री. रविंद्र चेनसुखलालजी गुगळे – ९८९०७२३४०२
❖ **अहमदनगर –** श्री. महेश एम. मुनोत– मो. ९४२०६३९२३०
❖ **जामखेड, आष्टी व कर्जत तालुका –** श्री. प्रफुल शांतीलालजी सोलंकी – मो. ९४०३६८५६७७, ८०८७७०००७०
❖ **सोनई –** श्री. मदनलालजी सी. भळगट – फोन : ०२४२७–२३१४६१, मो. ९८८१४१४२१७
❖ **औरंगाबाद –** श्री. सुभाषचंदजी मांडोत–फोन: (०२४०) २३५३४३८ मो.: ९४२२७०५९२१
❖ **मुंबई** खारघर– श्री. मदनलालजी गांधी–मो. ९८२०५३६७९३
❖ **नाशिक –** श्री. पुखराजजी बाबुलालजी जैन (कवाड) फोन:०२५३–२३११००८,मो.९४२३९३९९९०
❖ **नाशिक –** मनोज लखीचंदजी खिंवसरा, रविवार पेठ, नाशिक. मो. ९७६२२२१५०५
❖ **बीड –** श्री. अतुलकुमार शरदचंद्रजी कोटेचा, मो. ९९६००२४२२४
❖ **गारगोटी** (जि. कोल्हापूर) श्री. श्रीकांत राजाराम शहा, मो. ९८६०१०७७९२
❖ **श्रीरामपूर** –श्री. निलेश सुवालालजी हिरण, मो. : ९३२६९७२७४७
❖ **बारामती–** डॉ. महावीर छगनलालजी संचेती, फोन : ०२११२–२२३८०७ मो.:९३२५००४९५०
❖ **अमळनेर, जि. जळगाव –** श्री. मयुरकुमार केवलचंदजी जैन, मो. ९४२२६५७१७७
❖ **जळगाव –** श्री. अनील कुचेरिया, मो. : ९७६३६४५०५५
❖ **धुळे –** श्री. चेतन सतिष कोटेचा, सुभाषनगर, धुळे, मो. ९४०४१९२४३४, ९४२०६६१४२६
❖ **शहादा, जि. नंदुरबार –** श्री. मनोजकुमार विरचंदजी बाफना, मो. ९४२१५२९६२६
❖ **इचलकरंजी, जि. कोल्हापूर –** श्री. पोपटलालजी बिसनदासजी गुगळे, मो. ९८२२६५०९९८
❖ **मिरज, जि. सांगली –** श्री. राजेंद्र वसंतलाल शहा, मो. ९४२११०५७४८
❖ **कोल्हापूर –** सौ. लता कांतीलालजी ओसवाल, मो. ९४२३२८६०१४ फोन.०२३१–२६९५४३३
❖ **सातारा व सातारा जिल्हा –** श्री. जयकुमार कांतीलाल शहा, वाठार, मो. – ७५८८५६१३२०, ९८५०१८२६४४

**तीर्थंकर प्रभु महावीरांचे अंतिम वचन, श्रीमद् उत्तराध्ययन सूत्रावर आधारीत**

# ।। जिनेश्वरी ।।

**प्रवचनकार : उपाध्याय श्री प्रवीणऋषिजी म.सा.**

**भावानुवाद : साध्वी श्री ओजसदर्शनाजी म.सा., सौ. योगिता चंगेडे** *(क्रमशः)*

## अध्याय – २८ : मोक्षमार्ग–गति

**'आधि–व्याधि–उपाधी पासून**
**मुक्ती म्हणजेच मोक्ष.'**

तीन शब्द आहेत मोक्ष–मार्ग–गती. मोक्ष जर लक्ष असेल तर त्याचा मार्ग कसा असेल व त्या मार्गावर कशाप्रकारे चालावे ? कारण गती सुद्धा अनुरूप असली तर ती निर्विघ्न लक्ष्यापर्यंत पोहचवू शकते. पाण्यात चालायचं असेल तर पोहावे लागते, जमीनीवर चालायचं असेल तर एक–एक पाऊल टाकावे लागते. हवेत चालायचे असेल तर उडणारे साधन हवे. जसा मार्ग तशी गती ठेवावी लागते. रेल्वे रूळावरून मोटारगाडी पळवली जाऊ शकत नाही आणि महामार्ग किती ही चांगला असो रेल्वे चालवली जाऊ शकत नाही.

रस्त्याने चालतांना पण रस्त्याचे नियम असतात. सत्तेच्या मार्गाचे नियम वेगळे असतात, सत्याच्या मार्गाचे नियम वेगळे असतात. दोन्ही ही मार्गांवर कसं चालावं ? गतिचा काय अर्थ आहे ? मार्ग म्हणजे नेमके काय ? हे सर्व समजून मोक्षाचा मार्ग लक्षात घेऊया.

मोक्षाचे अनंत अर्थ आहेत. मोक्षाचा एक परिपूर्ण अर्थ असा आहे की जेथे गेल्यावर परतीची वाटच नाही. अनंत ज्ञान, अनंत दर्शन, अनंत शक्तीत तन्मय होऊन जाणे म्हणजेच मोक्ष. तो निर्व्याज आनंद म्हणजेच मोक्ष.

समस्या समोर आहे व तिचं निराकरण झालं, समस्येपासून मुक्ति म्हणजेच मोक्ष. व्याधीपासून मुक्ति म्हणजेच मोक्ष. दु:खापासून मुक्ती म्हणजेच मोक्ष. दु:ख मुक्त कसे होता येते ? समाचारी या २६ वा अध्यायात किती वेळा एक सूत्र गेले 'दुक्खखयाए काऊसग्गं' सर्व दु:खाचा नाश करण्यासाठी कायोत्सर्ग केला जातो. येणाऱ्या सर्व संकटांचे निवारण करण्यासाठी कार्यात्सर्गच केला जातो. जिनशासनात कायोत्सर्गाची एक अद्वितीय साधना आहे. ज्याच्यामुळे अर्जुनमाली सारखा अपराधी सुद्धा अरिहंत बनू शकला सुदर्शन श्रावकाने काय केले होते ? केवळ कायोत्सर्गात उभे होते. असो आपण पुन्हा पूर्व विषयावर येऊ या.

**मोक्षमार्ग कशाला म्हणतात ?**

संसार मार्ग तर तुम्हाला माहितच आहे. संसार मार्ग कशाला म्हणतात ? संशय म्हणजे संसार मार्ग अज्ञान म्हणजे संसाराचा मार्ग दुसऱ्याच्या खांद्याचा स्वत:च्या स्वार्थासाठी उपयोग करायचा म्हणजेच संसार मार्ग. संशयाविना संसार चालत नाही. मातीचा माठ जरी घ्यायचा असेल तरी तो ठोकूनच बघतात की पक्का आहे की नाही ? आधी संशय मग खरेदी करतात. संशय हाच संसार मार्ग आहे. श्रद्धा मोक्ष मार्ग आहे.

भार दुसऱ्यावर टाकू नये, आपली जबाबदारी कुणावर टाकू नये. ना कर्मावर ना नियतीवर, ना भाग्यावर, न कुण्या व्यक्तिवर. स्वत:ची जबाबदारी स्वत:च उचलावी यालाच चारित्र्य म्हणतात व स्वत:चे ध्येय प्राप्त करण्यासाठी जे काही प्रयत्न करावे लागतात, जे काही कष्ट करावे लागतात त्यालाच तप म्हणतात. केवळ उपाशी राहणे म्हणजे तप नव्हे. १२ तपापैकी

कोणत्याही एका तपात स्वत:ला वाहून घेणे याला तप म्हणतात. ज्यावेळी जे योग्य आहे तेच. कधी अनशन करावयास हवे, कधी अशी परिस्थिती येते कि ध्यानच त्या परिस्थितीचे समाधान असते. कधी-कधी सेवेच्या माध्यमातून समस्येचे समाधान होते. कधी अशी परिस्थिती येते शरणागती पत्करावी हेच समाधान. नम्र होणे हे ही तपच आहे. स्वाध्याय हे सुद्धा तपामध्येच समाविष्ट आहे. म्हणून तपाची अशी सुद्धा व्याख्या आहे. ज्या कारणांमुळे सिद्धीच्या मार्गात येणारे अडथळे दूर करता येतात त्याला तप म्हणतात. असे तप १२ प्रकारचे आहे. मोक्षमार्गाच्या चार गोष्टी आहेत.

समस्येला ओळखलं पाहिजे कारण मूळ कारण समजल्या शिवाय समस्या सोडविता येत नाही. समस्येचे स्वरूप ओळखा. समोरचा माणुस का चिडतोय याचं कारण जो पर्यंत कळणार नाही तोपर्यंत त्याच्या क्रोधाला आपण शांत करूच शकत नाही. कुणी लंगडत चालत असेल आणि त्याला फक्त सांगत गेलो की लंगडत चालू नकोस तर काही फायदा नाही. कारण शोधा लंगडण्याचं, पायात काटा रूतला आहे का ? नसावर नस चढली आहे का ? कुठे मुक्कामार आहे का ? सांध्यावर सूज आहे का ?

'णाणेण जाणइ भावे' कसं जाणावं? कशाला म्हणतात ज्ञान ? ज्ञानाची फार छोटीशी व्याख्या आहे जे आहे त्याला पाहा, जे ऐकू येत आहे त्याला ऐका, जे खात आहात त्याचा स्वाद घ्या. ज्यावेळी जे होत आहे त्याची त्यावेळी अनूभुती करणे म्हणजे ज्ञान. जे तिथे नाहीच त्याची अनुभूती करण्यामागे लागणं म्हणजे अज्ञान.

मनोभावाला जाणणे म्हणजे ज्ञान. समोरच्या व्यक्तिचे भाव काय आहेत ? त्याची क्षमता किती आहे ? त्याची योग्यता आहे काय ? त्या योग्यतेला, क्षमतेला समजणे म्हणजेच ज्ञान आहे. आपण जे आहे त्याला ओळखतो. की जे नाही त्याला ओळखतो ? चिंता, भय, उद्विग्नता याचे मूळ कारण आहे आपले अज्ञान. यातून मुक्त होण्यासाठी भगवंतांनी लहानसा उपाय २४ व्या अध्यायात अष्टप्रवचन मातेच्या विवेचनातच सांगितला आहे. जे आहे ते जाणून घेण्याचा प्रयत्न करा, जे नाही त्यात आपली उर्जा खर्चू नका.

जे अस्तित्वात आहे, त्यात भगवंत्तेचा साक्षात्कार करणे श्रद्धा आहे. जे आहे त्याच्या प्रती श्रद्धेचा भाव जागृत होणे हे दर्शन आहे. जे आहे, जे मिळाले आहे ते श्रद्धेय आहे. जसा पुत्र मिळाला, जसा शिष्य मिळाला त्याच्यावर श्रद्धा ठेवली. जसे गुरू मिळाले, जसे माता-पिता मिळाले ते श्रद्धेय आहेत. जे मिळाल ते ईश्वरस्वरूप आहे तेच श्रेष्ठ आहे.

ज्याच्यामुळे मन हलके होते, ताण नाहीसा होतो ते चरित्र आहे व चरित्रामुळेच निग्रह होतो. जस जसे आपल्या मनावरचे ओझे उतरत जाते तसतसे आपले अंतरंगातले शत्रू बंदीस्त होत जातात. नियंत्रणात येतात हाच निग्रह आहे. ज्याच्यामुळे ज्ञान शुद्ध होते, श्रद्धा पवित्र होते, चरित्र निर्मळ होते ते तप आहे. ज्ञानात गडबड झाली, श्रद्धेत दुर्भावना आली, आचरणात चूका झाल्या ते सर्व तपामुळे शूद्ध होऊन जाते. असे ज्ञान, दर्शन, चारित्र व तप आहेत पण सर्वात आधी श्रद्धा आहे जोपर्यंत श्रद्धा नाही तोपर्यंत ज्ञान नाही व आचरणही नाही, समाधानी नाही अशा श्रद्धेला प्राप्त करण्याचे १० मार्ग भगवंत सांगतात. ज्ञानप्राप्तीचे मार्ग दिलेच नाहीत. श्रद्धा आली की ज्ञान, दर्शन चारित्र प्राप्त झाले.

**श्रद्धाप्राप्ती रूचि**

१) निसर्ग - जस फुल अलगदपणे, सहजपणे उमलत तसा देव-गुरू-धर्माविषयी नैसर्गिकपणे, सहजपणे भगवंत भाव जागृत होणे ही निसर्ग रूचि आहे.

२) उपदेश - ज्याला नैसर्गिकपणे भाव जागृत होत नाहीत त्याची उपदेश ऐकून रूची उत्पन्न होते. काही जणांना संक्षिप्त-अल्पमधे रूची असते तर काही

जणांना विस्तार-विश्लेषणात रूची असते.

३) आज्ञा - काही जणांना उपदेशात रस नसतो त्यांना गुरू-भगवंतांच्या आज्ञेचे पालन करण्यात आनंद येतो.

४) सूत्ररूचि - काही फक्त सूत्रात रूचि ठेवतात. असे लोक सूतावरून स्वर्ग गाठतात. सूत्राद्वारेच अंतरंगात आनंदाची अनुभूती येते.

५) बीजरूचि - काही जणांना 'बीज'एकदा मिळाले की ते जंगल उभ करतात. ते जंगल मिळण्याची, फळ मिळण्याची अपेक्षा करीत नाहीत. ज्यांना फळात रूची असते त्यांना बी रूजून वृक्ष बनण्यापर्यंत वाट पाहण्यात रस नसतो.

परंतु बंधूंनो लक्षात ठेवा बीज हे अमर असत, फळ हे मरण धर्मा असते, त्याची एकच गति असते सडण्याची. फळ किती सुंदर असले तरी ते सडते. फळ एक वेळची भुक भागवितो, बीज जन्माची भूख भागवितो बीजावर प्रेम करणाऱ्यांना अमरतेचे वरदान मिळते.

६) अभिगमरूचि - जेवढे आगम आहेत त्यांचा स्वाध्याय करून तत्व उपलब्धी करतात त्यांची अभिगम रूचि असते.

७) विस्तार रूचि - ज्यांना प्रत्येक गोष्ट विस्ताराने समजुन घेण्यात रस असतो, विस्तार विवेचनातून सत्याची उपलब्धी करतात त्यांची विस्तार रूचि असते.

८) क्रियारूचि - क्रिया करतात करता त्यात आनंद घेता घेता ज्यांना सम्यकत्वाची प्राप्ती होते.त्यांची क्रियारूचि असते. यात फक्त क्रिया नाही. क्रियेबद्दल अहोभाव असतो, त्यात आनंद येतो, क्रियेचा बहूमान असतो तेव्हांच सम्यकत्वाची प्राप्ती होते तीच क्रिया करताना आनंदाऐवजी अहंकार जागृत झाला. तर तीच क्रिया अधोगतीस कारणीभूत ठरते.

९) संक्षेपरूचि - काहींना संक्षेपात रूचि असते. भगवंतांनी जेवढे सांगितले तेवढे ऐकले, जाणले, मानले, त्याचा असे लोक अल्प ज्ञानानेही तरून जातात.

१०) धर्मरूचि - धर्माचे जे रूप आहेत, अस्तिकाय धर्म, श्रुतधर्म, चरित्र धर्म यात जो रस घेतो, स्वत:चा बहुमान समजतो, अहोभावाने धर्म करतो, त्याची धर्मरूचि आहे.

जो धर्म फक्त स्वार्थासाठी न करता मनात भाव जागृत करतो की या जीभेने कितीतरी वाईट शब्दांचे उच्चारण केले आहे, या जीभेला भगवंतांनी रूचिलेले, बोललेले शब्द उच्चारण करण्याची संधी मिळाली आहे यापेक्षा अहोभाग्य दूसरे नाही तर तो धर्मरूचिला प्राप्त होतो.

अशी श्रद्धा प्राप्त करून जो ज्ञान, दर्शन, चारित्र्य मिळवतो त्याची गती पण चांगली असते, मार्ग प्रशस्त होतो व मोक्ष प्राप्तीही सहज सुलभ होते. ●

**जैन जागृति - सप्टेंबर २०१८**

**पर्युषण अंक**

**या अंकासाठी २० ऑगस्ट पर्यंत जाहिरात द्या.**

महाराष्ट्रातील जास्तीत जास्त जैन समाजापर्यंत पोहचण्याचा सर्वात खात्रीशीर, सर्वात सोपा व सर्वात स्वस्त मार्ग...

**जैन जागृति**

## कव्हर तपशील - ऑगस्ट २०१८

❖ **श्री जैन महासंघ, चेन्नई**

श्री जैन महासंघ, चेन्नई की आयोजन में जैन धर्म के विभिन्न सम्प्रदयों के आचार्यो एवं उपाध्यायों की सामूहिक धर्म परिचर्चा का आयोजन हुआ।

जैन समाज के चारों सम्प्रदाय दिगम्बर, तेरापंथ, मूर्तिपूजक एवं स्थानकवासी के आचार्य एवं उपाध्याय की सामुहिक गोष्ठी के आयोजन में तेरापंथ धर्मसंघ में ११ वें आचार्य श्री महाश्रमणजी म.सा. दिगम्बर संघ के आचार्य श्री पुष्पदंतसागरजी म.सा., मूर्तिपूजक संघ के आचार्य श्री विजय तीर्थभद्रसूरीश्वरजी म.सा., आचार्य श्री जग्गचन्द्रसूरीश्वरजी म.सा., श्री पूर्णानंद सूरीश्वरजी म.सा., उपाध्याय प्रवर श्री प्रवीणऋषिजी म.सा., उपप्रवर्तक विनय मुनि एवं गौतम मुनि म.सा. ने सामूहिक विचार गोष्टी में की शिरकत कर जैन एकता का अनुपम विचार उदाहरण प्रेषित किया।

❖ **सुखसागर नगर, पुणे – चातुर्मास**

श्री वर्धमान स्थानकवासी जैन महासंघ दक्षिण विभाग पुणे तर्फे महाराष्ट्र प्रवर्तक श्री कुंदनऋषिजी म.सा., ठाणा ३ व साध्वीश्री डॉ. दर्शनप्रभाजी म.सा. ठाणा ४ यांचा चातुर्मास महेश सांस्कृतिक भवन येथे संपन्न होत आहे. चातुर्मास प्रवेश २० जुलै रोजी भव्य कार्यक्रमात संपन्न झाला. यावेळी गुरुदेवां सोबत कॉन्फ्रेन्स अध्यक्ष श्री. मोहनलालजी चोपडा, श्री. पुखराजजी हिरण, श्री. बाळासाहेब धोका, श्री. बाळासाहेब कोयाळीकर इ. मान्यवर.

❖ **राष्ट्रसंत मुनिश्री पुलकसागरजी म.सा., पुणे**

भारत गौरव राष्ट्रसंत मुनिश्री पुलकसागरजी म.सा., यांचा चातुर्मास महालक्ष्मी लॉन्स, राजाराम पुलाजवळ, कर्वेनगर, पुणे ५२ येथे संपन्न होत आहे. सकल जैन वर्षा योग समिती पुणे व पुणे परिसर द्वारा चातुर्मासाचे आयोजन होत आहे. चातुर्मास प्रवेश २२ जुलै रोजी झाला. गुरुदेवांची आरती करताना शोभाताई धारीवाल, श्री. मिलींद फडे, श्री. चकोर गांधी इ. मान्यवर.

❖ **गोडीजी मंदिर, पुणे – चातुर्मास**

प.पू. तत्त्वप्रवचन तज्ञ आचार्य देवेश श्री विजय रत्नचंद्र सुरीश्वरजी म.सा. (डहेलावाले) पंन्यास प्रवर श्री उदयरत्न विजयजी म.सा. आदि ठाणा व साध्वी श्री गुणदक्षाश्रीजी म.सा. आदि ठाणा यांचा चातुर्मास होत आहे. चातुर्मास प्रवेश २१ जुलै रोजी भव्य वरघोड्यात संपन्न झाला.

❖ **महावीर प्रतिष्ठान, पुणे – चातुर्मास**

श्री वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघ, महावीर प्रतिष्ठान, पुणे येथे आगमवेत्ता महासाध्वी श्री वैभवश्रीजी म.सा. 'आत्मा', श्री देशनाश्रीजी म.सा., श्री चरमश्रीजी म.सा., श्री नियागश्रीजी म.सा. आदी ठाणा ४ यांचा चातुर्मास होत आहे. चातुर्मास प्रवेश २२ जुलै रोजी संपन्न झाला.

❖ **ऋषि आनंद वन, पुणे – भूमिपूजन व वृक्षारोपण**

जय आनंद ग्रुप व लायन्स क्लब ऑफ पुणे, गणेशखिंड यांच्या संयुक्त विद्यमाने सातववाडी, हडपसर येथे ऋषि आनंदवन हे उभारले जात आहे. या आनंद वनचे भूमिपूजन व वृक्षारोपण कार्यक्रम खासदार श्री. दिलीपजी गांधी, महापौर सौ. मुक्ता टिळक यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी सोबत ऋषि आनंद वनचे अध्यक्ष श्री. विजयकुमार मर्लेचा, लायन्स क्लब ऑफ पुणेचे अध्यक्ष श्री. विजय भंडारी, नगरसेवक श्री. प्रवीण चोरबेले, नगरसेवक श्री. योगेश ससाणे, शांतीलालजी नवलखा, विजय पारख, झुंबरलालजी कोठारी इ. मान्यवर.

❖ **'के. कोठारी टोयोटा' पुणे – शोरुम उद्घाटन**

बावधन, पुणे येथे 'के. कोठारी टोयोटा' या भव्य शोरुमचे उद्घाटन टोयोटा किर्लोस्कर मोटारचे उप व्यवस्थापकिय संचालक एन. राजा व श्री. आशिष राजेंद्रजी कोठारी, श्री. राजेंद्र बंकटलालजी

कोठारी यांची हस्ते करण्यात आले. यावेळी श्री. विजयकांतजी कोठारी, श्री. नितिन कोठारी इ. अनेक मान्यवर उपस्थित होते.

❖ **नवकार आर्ट ग्रुप, पुणे – चित्रकला प्रदर्शन**

''नवकार आर्ट ग्रुप'' तर्फे बालगंधर्व कलादालन, पुणे येथे भव्य चित्रकला प्रदर्शन आयोजन करण्यात आले. श्री. मनसुखजी छाजेड यांच्या कल्पनेतुन हे प्रदर्शन आयोजित करण्यात आले. सुमारे ३८ कलाकारांनी आपले चित्र प्रदर्शित केले. या प्रसंगी प्रदर्शन पाहताना डॉ. कांतीलालजी संचेती, चित्रकार मुरली लाहोटी, प्रवीण चोरबेले, संजय चोरडिया – जैन जागृति इ. मान्यवर.

❖ **भाजपा राष्ट्रीय अध्यक्ष श्री. अमित शहा – सन्मान**

भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री. अमित शहा, पुणे येथे आले असताना जितोचे डायरेक्टर व युवा उद्योगपती श्री. संतोषजी जैन व जितोचे प्रेसिडेन्ट श्री. विजयजी भंडारी यांनी स्मृतिदिन देऊन त्यांचा सत्कार केला.

❖ **सुर्यदत्त ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट, पुणे**

सुर्यदत्त ग्रुप ऑफ इन्स्टिट्युटच्या एस सी एच एम टी टी मध्ये प्रथम वर्षात शिकत असलेल्या अनिमेश पाध्ये याने पाचव्या स्टुडन्टस् ऑलिपिंक राष्ट्रीय स्पर्धेत योग या खेळामध्ये १९ वर्षाखालील मुलांच्या वयोगटामध्ये प्रथम क्रमांक मिळवत सुवर्णपदक पटकाविले आहे. सदर यशाबद्दल डॉ. संजय चोरडिया यांनी अनिमेश पाध्येचे अभिनंदन केले.

❖ **चि. आनंद ललवाणी – सुयश**

पुणे येथील चि. आनंद विकासजी ललवाणी व त्याच्या टिमने बनवलेल्या ''इक्विसॅट'' या विद्यार्थी उपग्रहाचे नासा येथून यशस्वी प्रक्षेपण करण्यात आले. चि. आनंदच्या या यशस्वी कामागिरी बद्दल महावीर प्रतिष्ठान पुणे तर्फे अभिनंदनाचा कार्यक्रम आयोजित केला. पद्मविभूषण डॉ. के. एच. संचेती व मुंबई येथील प्रसिद्ध बिल्डर्स व समाजसेवी व आनंद चे नानाजी श्री. सुभाषजी रूणवाल यांच्या हस्ते आनंदचा सन्मान करण्यात आला.

## पर्युषण पर्व - क्षमा पर्व

## जैन जागृति - पर्युषण अंक

जैन धर्मात ''पर्युषण पर्व'' सर्वांत महत्त्वाचा उत्सव पर्व आहे. या काळात समाज बांधव जास्तीत जास्त धर्म आराधना करतात. संवत्सरीच्या वेळी व्यक्ति, समाज व संपुर्ण जीव जगताला क्षमा देतो व क्षमा घेतो.

जैन जागृतित क्षमापनाची जाहिरात देऊन आपण जास्तीत जास्त जैन समाजापर्यंत पोहचता. जैन जागृतित जाहिरात देऊन जैन समाजाशी संवाद साधा.

**पर्युषण अंकासाठी २० ऑगस्ट २०१८ पर्यंत जाहिरात पाठवा.**

| आर्ट पेपर वर रंगीत (Colour) जाहिरात | |
|---|---|
| • पूर्ण पान | • रु. ८५००/-* |
| • १/२ पान | • रु. ४६००/-* |
| • *डिझाईन व पॉझेटिव्ह खर्च वेगळा | |
| • GST - 5% Extra. | |

| व्हाईट पेपरवर एका रंगात (Black & White) जाहिरात | |
|---|---|
| • पूर्ण पान | रु. ४०००/- |
| • १/२ पान | रु. २४००/- |
| • १/४ पान | रु. १२५०/- |
| • १/८ पान | रु. ८००/- |

आजच्या स्पर्धेच्या युगात जाहिरात ही अत्यावश्यक बाब झाली आहे. जैन समाजात ''जैन जागृति'' हे सर्वांत प्रभावी माध्यम आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात ''जैन जागृति'' मध्ये द्या. – संपादक

E-mail - jainjagruti1969@gmail.com www.jainjagruti.in